RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१ईमेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक : साशा कार्या/ब-५/containment zone/रद्द आदेश/तेलीपाडा/उरण/२०२० दिनांक : १९/०६/२०२०.

**वाचले:-**

१. **महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
२. **महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०**
३. **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४**
४. **महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६**
५. **भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७**
६. **महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०**
७. **तहसिलदार उरण यांजकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-२/चाणजे/बोकडविरा/टाऊनशिप/कन्टेंनमेंट झोन/२०२०, दिनांक १६/५/२०२०.**
८. **या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना/रूग्ण/तेलीपाडा-उरण/२०२०, दिनांक १८/५/२०२०.**
९. **तहसिलदार उरण यांचेकडील पत्र क्र. जा.क्र/कोरोना/तेलीपाडा-उरण/२०२०-२१, दिनांक १७/६/२०२०**

---

**आदेश,**

ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र. ८ कडील आदेशान्वये रायगड जिल्हयातील उरण तालुक्यातील मौजे तेलीपाडा येथे १ कोरोना बाधित रुग्ण आढळल्याने, खालील क्षेत्र Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे.

**कोरोना बाधीत रुग्ण रहात असलेली मौजे तेलीपाडा ता. उरण येथील सदरचे रुग्ण रहात असलेल्या घराच्या पुर्वेला- तेलीपाडा गावाचा भाग, दक्षिणेला जरी मरी माता मंदिराजवळील रस्ता- उत्तरेला संतोष कमलाकर म्हात्रे व प्रकाश म्हात्रे यांच्या घरामधील रस्ता हा परिसर.**

उपरोक्त Containment Zone मधील रुग्ण यांना रुग्णालयातून दि.२६/०५/२०२० रोजी डिस्चार्ज देण्यात आल्याबाबत व शेवटचा रुग्ण बरा होऊन २३ दिवसांचा कालावधी पुर्ण झाल्याबाबत व आजमितीस एकही नविन रुग्ण आढळून आलेला नसल्याने सदर Containment Zone रद्द करण्याबाबत तहसिलदार उरण यांनी दि.१७/०६/२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

सबब वरील वस्तुस्थिती व तहसिलदार उरण यांचे दि.१७.०६.२०२० चे पत्र विचारात घेता, मौजे तेलीपाडा, ता. उरण, जि. रायगड येथील कोरोना बाधीत रुग्णाला रुग्णालयातून दि.२६/०५/२०२० रोजी डिस्चार्ज मिळाल्याने. तसेच या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या अन्य व्यक्तीही आद्याप पर्यंत कोरोना विषाणू मूळे संसर्ग झाल्याचे आढळून आलेले नाही, त्यामुळे मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र) व प्रतिबंधीत म्हणून जाहीर केलेले, **कोरोना बाधीत रुग्ण रहात असलेली मौजे तेलीपाडा ता. उरण येथील सदरचे रुग्ण रहात असलेल्या घराच्या पुर्वेला- तेलीपाडा गावाचा भाग, दक्षिणेला जरी मरी माता मंदिराजवळील रस्ता- उत्तरेला संतोष कमलाकर म्हात्रे व प्रकाश म्हात्रे यांच्या घरामधील रस्ता हा परिसर/क्षेत्र Containment Zone व प्रतिबंधीत क्षेत्रातून वगळण्याबाबतचे आदेश देत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग
Collector Raigad-Alibag

सही--
**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- मुख्याधिकारी, नगरपालिका उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्षक, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

(रविंद्र मठपती)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
नोडल अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड